# Every Farmer has Grain his home, This is true Food Security

**Sakal Nagpur Vidarbha Vishvesh, July 14, 2009**

# घरोघरी धान्य, हीच खरी 'अन्नसुरक्षा'

## डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीकडून डोरलीत ज्वारी लागवडीचा प्रयोग

**वर्धा, ता. १४ :** देशात धान्यसाठा असणे, ही 'अन्नसुरक्षा' नसून घरोघरी भरपूर धान्यसाठा असणे, हीच खरी 'अन्नसुरक्षा' आहे. गाव विकायला काढणाऱ्या डोरली येथील शेतकऱ्यांनी ज्वारी लागवडीचा घेतलेला निर्णय व पुढील उपक्रमांचे नियोजन गावाला अन्नसुरक्षा देईल. डोरलीपासून विदर्भाचे अन्नसमृद्धीचे नवे भविष्य सुरू झाले असेच समजा, असे आंध्रप्रदेशातील डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीचे संचालक पी. व्ही. सतीश मंगळवारी (ता.१४) पत्रपरिषदेत म्हणाले.

डोरलीच्या शेतकऱ्यांनी ६० एकरांत ज्वारीची लागवड केली आहे. या लागवडीची पाहणी करण्याकरिता श्री. सतीश येथे आले होते. डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीच्या वतीने ज्वारीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी दोन हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. हे शेतकरी ज्वारीचे पीक



**वर्धा : डोरली येथे नवीन योजनांबाबत माहिती देताना पी. व्ही. सतीश, शेजारी विजय जावंधिया.**

हाती आल्यानंतर त्यातील एक क्विंटल किंवा परिस्थितीप्रमाणे ज्वारी गावाच्या धान्यकोषाकरिता देतील. पुढे ही ज्वारी गावातील गरजू शेतकऱ्यांना विकण्यात येईल. त्यातून येणाऱ्या रक्कमेचा गावाला बँकेप्रमाणे मदत देण्यास उपयोग होईल, असे श्री. सतीश यांनी सांगितले.

पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या वायफड भेटीत शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी ज्वारी पिकविणाऱ्या शेतकऱ्याना एकरी एक हजार रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी केली होती. ही मागणी श्री. सतीश यांच्यापर्यंत गेली आणि त्यांनी श्री. जावंधिया यांच्याशी संपर्क साधून ही योजना डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीमार्फत एकरी दोन हजार रुपयांचे अनुदान देऊन राबविण्याचे ठरविले. विदर्भ ज्वारी उत्पादनाचे आगार होते. येथील ज्वारी पेरणी थांबल्यानेच सारी संकटे उभी राहिली. ज्वारीमुळे आरोग्य, अन्न, चारा, पर्यावरण, आर्थिक तसेच जगा आणि जगू द्या, ही सद्भाव सुरक्षा मिळते, असे श्री. सतीश यांनी सांगितले. आतापर्यंत शासन आणि कृषी विद्यापीठाने राबविलेले सारे प्रयोग शेतीवरील शेतकऱ्यांचे नियंत्रण जावे, त्याला परावलंबी करावे, यासाठीचेच होते. त्याने काय पेरावे, याचा निर्णय दुसरेच घेतात. आम्ही ज्वारीच्या पेरणीतून त्याचे डोके त्यांच्याजवळ, शेती त्याच्यांजवळ, अन्न त्याच्याजवळ आणि त्याचा आंतमसन्मानही त्याच्याजवळ, असे वातावरणही निर्माण करणार आहोत.